क्रमांक : १५५२० / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०२३

**प्रेषक :-**

सचिव-(१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**विधानसभेचे सर्व सन्मा. सदस्य**

**विषय: मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या **गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३** रोजीपासून सुरु होणाऱ्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३** रोजी **ई-मेलद्वारे** पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

**सदरहू अधिवेशनासाठी तारांकित प्रश्न सूचना शुक्रवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वा. पासून QIS या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येतील. मा.सदस्यांना प्रश्न सूचना स्विकारण्याच्या प्रथम दिनांकापासून चक्रानुक्रमात नमूद केलेल्या विवक्षित उत्तराच्या दिनांकाकरिता प्रश्न सूचना स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रश्न सूचना या सचिवालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

कृपया याची नोंद घ्यावी.

आपली

**( मेघना तळेकर )**
सह सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :-**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

क्रमांक : १२८

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ / आश्विन २०, शके १९४५

### महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम

१२८. महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नाचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नाच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल. मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधिन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ व ४)**

पहिल्या आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३** रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता सह सचिव / अवर सचिव / अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

:: विवरणपत्र ::

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(५) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री<br>(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री<br>(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ |
| दोन | मुख्यमंत्री | मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३<br>मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३<br>*मंगळवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ |

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| तीन | (१) वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री<br>(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री<br>(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(४) कामगार मंत्री<br>(५) उद्योग मंत्री<br>(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(७) महिला व बालविकास मंत्री<br>(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री<br>(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३<br>बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३<br>*बुधवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ |
| चार | (१) सहकार मंत्री<br>(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री<br>(३) वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) कृषी मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री<br>(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री | गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३<br>गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३<br>गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२३<br>*गुरुवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२३ | सोमवार, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ |
| पाच | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) मृद व जलसंधारण मंत्री<br>(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री<br>(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री | शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२३ | मंगळवार, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३<br>मंगळवार, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२३<br>*मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२३ |

*** गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ पासून सुरू होणाऱ्या अधिवेशनासाठी अंदाजित तीन आठवड्यांच्या कालावधीत वाढ झाल्यास पूर्व खबरदारी म्हणून जादा एक आठवड्याच्या प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.**

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : १२ ऑक्टोबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**प्रति :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.
(४) संगणक कक्ष व MKCL कक्ष.

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

(१) **श्री.एकनाथ संभाजी शिंदे – मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी वगळून)
(२) नगरविकास विभाग
(३) माहिती तंत्रज्ञान विभाग
(४) माहिती व जनसंपर्क विभाग
(५) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)
(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (सामाजिक न्याय विषयक बाबी)
(७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
(८) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (खनिकर्म विषयक बाबी)
(९) इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय.

(२) **श्री.देवेंद्र गंगाधरराव फडणवीस – उप मुख्यमंत्री**

(१) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन व बंदरे विषयक बाबी वगळून)
(२) विधी व न्याय विभाग
(३) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग
(४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा विषयक बाबी)
(५) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)

(३) **श्री.अजित अनंतराव पवार – उप मुख्यमंत्री**

(१) वित्त विभाग
(२) नियोजन विभाग (रोजगार हमी विषयक बाबी वगळून)

(४) **श्री.छगन चंद्रकांत भुजबळ – अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(५) **श्री.दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील – सहकार मंत्री**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार विषयक बाबी)

(६) **श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील – महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (महसूल विषयक बाबी)
(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विषयक बाबी)

(७) **श्री.सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार – वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (वने विषयक बाबी)
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (मत्स्यव्यवसाय विषयक बाबी)

(८) **श्री.हसन मियालाल मुश्रीफ – वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री**

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विशेष सहाय्य विषयक बाबी)

(९) **श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील – उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री**
(१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग
(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग विषयक बाबी)
(३) संसदीय कार्य विभाग

(१०) **श्री.विजयकुमार कृष्णराव गावित – आदिवासी विकास मंत्री**
आदिवासी विकास विभाग

(११) **श्री.गिरीष दत्तात्रय महाजन -- ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
(१) ग्रामविकास व पंचायत राज विभाग
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (पर्यटन विषयक बाबी)

(१२) **श्री.गुलाबराव रघुनाथराव पाटील -- पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(१३) **श्री.दादाजी दगडू भुसे – सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम विषयक बाबी)

(१४) **श्री.संजय दुलीचंद राठोड – मृद व जलसंधारण मंत्री**
मृद व जलसंधारण विभाग

(१५) **श्री.धनंजय पंडितराव मुंडे – कृषी मंत्री**
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषी विषयक बाबी)

(१६) **श्री.सुरेश (भाऊ) दगडू खाडे – कामगार मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)

(१७) **श्री.संदिपानराव आसाराम भुमरे -- रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**
(१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (फलोत्पादन विषयक बाबी)

(१८) **श्री.उदय रविंद्र सामंत – उद्योग मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग विषयक बाबी)

(१९) **श्री.तानाजी जयवंत सावंत -- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

(२०) **श्री.रविंद्र दत्तात्रय चव्हाण -- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(२१) **श्री.अब्दुल सत्तार – अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री**
(१) अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग
(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (पणन विषयक बाबी)

(२२) **श्री.दिपक वसंतराव केसरकर -- शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**
(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (शालेय शिक्षण विषयक बाबी)
(२) मराठी भाषा विभाग

(२३) **श्री.धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम – अन्न व औषध प्रशासन मंत्री**
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)

(२४) **श्री.अतुल मोरेश्वर सावे – गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**
(१) गृहनिर्माण विभाग
(२) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

(२५) **श्री.शंभूराज शिवाजीराव देसाई – राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

(२६) **श्रीमती आदिती वरदा सुनिल तटकरे – महिला व बालविकास मंत्री**
महिला व बालविकास विभाग

(२७) **श्री.संजय बाबुराव बनसोडे – क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री**
(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (क्रीडा व युवक कल्याण विषयक बाबी)
(२) गृह विभाग (बंदरे विषयक बाबी)

(२८) **श्री.मंगल प्रभात लोढा -- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

(२९) **श्री.अनिल भाईदास पाटील – मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री**
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन विषयक बाबी)

* * * * * * *